अंक ३८६

# उत्कर्षवृत्त

चां.का.प्रभु सभेचे मुखपत्र

ऑक्टोबर २०२३ ते जुलै २०२४

अध्यक्ष
**सुजीत वि. कोर्डे**
**M. 98796 18327**

मुख्य संपादक
**प्रकाश स. आंबेगांवकर**
**M. 99798 53411**

सह संपादक
**सतीश कृ. समर्थ**
**M. 98255 44459**

सदस्य संपादक समिति
**अरुण धारकर | प्रकाश सिंदकर | सतिष ताम्हणे**
(कार्यवाह, चां.का. प्रभु सभा, बडोदे)
**M. 98240 77982**

**कार्यालय**
लक्ष्मीसदन पारकर वाडा,
दांडीया बाजार, बडोदे-३९० ००१.
वेळ : सायंकाळी ६ ते ८ (रविवारी रजा)
Email : ckpsabha@gmail.com
website : www.ckpworld.org

**देणगी या खात्यांत जमा करावी**
C.K.P. Sabha
Bank of Baroda
SB A/C No. 01900100017020
IFSC Code : BARB0KHAND
(Fifth Character is Zero)

SCAN TO PAY ANY UPI APP
vpa : chand98240@barodampay

मालक चां.का. प्रभु सभा, बडोदे करीता
श्री संतोष अधिकारी यांनी प्रकाशीत केले,
व श्री प्रकाश स. आंबेगांवकर, मुख्य संपादक यांनी
ग्राफिक कॉम्युनिकेशन शंकर टेकडी, दांडीया बाजार,
बडोदे येथे छापुन घेतले.

खाजगी प्रसारासाठी
या अंकात प्रकाशित झालेल्या लेखातील मतांशी
संपादक व समिति सहमत असेलच असे नाही.

## संपादकीय

१०वी आणि १२वी च्या परीक्षांचे परिणाम घोषित झाल्या नंतर पुढील उच्चतर शिक्षण पसंतीच्या शिक्षण शाखेत आणि शिक्षण संस्थेत (सरकारी किंवा खाजगी) मिळवणे हे जिकीरीचे काम असते. स्पर्धात्मक परीक्षांच्याद्वारे सरकारी किंवा खाजगी शिक्षण संस्थेत प्रवेश मिळवण्यासाठी विद्यार्थी प्रयत्नांची शिकस्त करतात. शैक्षणिक पात्रता मिळवून आपली कारकीर्द (नोकरी किंवा व्यवसाय) आणि विकास सुनिश्चित करणे हे खूप महत्वाचे असते. इंजिनियरिंग, मेडिसिन, व्यवस्थापन, कॉमर्स, अकौंटस, लिगल, शिक्षण, विज्ञान यात शैक्षणिक प्राविण्य मिळवून खाजगी किंवा सरकारी नोकरी मिळवणे किंवा स्वतःचा व्यवसाय सुरु करणे यासाठी सातत्याने कठोर परिश्रम आवश्यक असतात. अनेक विद्यार्थ्यांचे भारतीय नागरी सेवा आणि सशस्त्र दल सेवा यांच्या स्पर्धात्मक परीक्षा उत्तीर्ण करून चांगली कारकीर्द प्राप्त करणे हे जीवनाचे लक्ष्य व स्वप्न असते. अशा विद्यार्थ्यांना आपल्या वैयक्तिक प्रगती बरोबरच राष्ट्राच्या सेवेत आणि विकासात भागीदार होता येते.

सध्याच्या स्पर्धात्मक जगात नोकरी मिळवणे सोपे राहिले नसून खूप मेहनत घेऊन स्पर्धात्मक चाचण्या उत्तीर्ण कराव्या लागतात ज्यात सामान्य ज्ञान, गणित, बुद्धिमत्ता यांची कसोटी होते. सामान्य ज्ञान वाढवण्यासाठी चालू घडामोडी संबंधी माहिती पुस्तके, समाचार पत्र, टीव्ही व ईतर माध्यमातून मिळवायची सवय लावायला लागते. या व्यतिरिक्त, शारीरिक परीक्षा, लेखी परीक्षा, मुलाखत यासारख्या काही नोकरीच्या प्रक्रिया आहेत ज्या गोष्टींची देखील तयारी लागते. काही विद्यार्थी नोकरी ऐवजी व्यावसायिक होऊन स्व:रोजगार मिळवण्याचा निर्णय देखील धाडसाने उचलतात. कठोर परिश्रम, योग्य नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास, उजळणी आणि मानसिकदृष्ट्या कणखरपणा ही विद्यार्थ्यांसाठी यशाची गुरुकिल्ली आहे.

आपल्या अनेक ज्ञाती बांधवांनी नागरी सेवा आणि सशस्त्र दल सेवा यात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. काही बांधवांनी चांगले व्यावसायिक होऊन यश प्राप्त केले आहे आणि हा वारसा आपल्या नवीन पिढीने पुढे चालवायला हवा. ज्ञातीच्या सर्व होतकरू विद्यार्थ्यांना यशस्वी मार्गक्रमणे साठी अनेक शुभेच्छा.


**–प्रकाश आंबेगांवकर**

Karuya BhramanTea Tours

@bhramantea



**स्पिती व्हॅली**
16 - 23 सप्टेंबर



**भूतान**
21 - 28 सप्टेंबर



**चारधाम**
14 - 26 ऑक्टोबर



**पन्ना-खजुराहो - झासी - ग्वाल्हेर**
26 नोव्हेंबर ते 3 डिसेंबर



**अयोध्या - वाराणसी**
10 - 15 डिसेंबर



**UnSeen अंदमान**
नोव्हेंबर, डिसेंबर



**दत्तधाम**
ऑक्टोबर - डिसेंबर



**हंपी - बदामी**
8 ते 12 जानेवारी



**ताडोबा** 1-3 ऑक्टोबर
17-20 ऑक्टोबर,
29 नोव्हेंबर-1 डिसेंबर
30 डिसेंबर - 1 जानेवारी



**पेंच**
15 - 17 नोव्हेंबर,
6 - 8 डिसेंबर



**बांधवगड - भेडाघाट**
30 डिसेंबर - 3 जानेवारी



**कान्हा**
21 - 24 नोव्हेंबर

**देशांतर्गतः** अयोध्या, वाराणसी, अष्टविनायक यात्रा, आसाम-मेघालय, कोस्टल कर्नाटक, हैद्राबाद दर्शन, श्रीशैलम, जगन्नाथ पुरी,उत्तराखंड, राजस्थान, सौराष्ट्र (गिरनार, सोमनाथ, द्वारका, गिर जंगल), स्टॅच्यू ऑफ युनिटी,

**आंतरराष्ट्रीयः** मालदीव, श्रीलंका, दुबई, मलेशिया, थायलँड, सिंगापूर, कंबोडिया, व्हिएतनाम, मॉरिशस, इ.

Karuya BhramanTea Tours

Reg.office: 5, Matrukrupa, Vrundavan Nagar,
Ashoka Marg, Nashik, Maharashtra, BHARAT

Mrs. Uma Deshpande : 9920801281 (Pune)
Rajendra Deshpande : 9220829392 (Nashik)
Mandar Khedekar : 9372501323 (Andheri)
Sapna Bendre : 9137280670 (Thane)
Onkar Golvalkar : 9822703997 (Pune)

www.karuyabhramantea.com bhramantea@gmail.com

# अध्यक्षांचे मनोगत

आदरणीय वाचकहो, सप्रेम नमस्कार,

उत्कर्षवृत्ताचा नवीन अंक आपल्या हातांत देताना मला खूप आनंद होत आहे. काय म्हणता ? अंक इतक्या महिन्यानंतर देत आहात, त्याचे तुम्हाला काहिच वाटत नाही का ?

सॉरी! क्षमस्व! हयाचं उत्तर मी माझ्या प्रत्येक ''अध्यक्षांचे मनोगत'' ह्या सदरात देत असतो, पण कोणी काही मनावर घेत नाही. अंकात छापायला जाहिराती आणत नाही. देणग्या देत नाही. कोणी उपाय सुचवत नाही. प्रत्येक अंकामागे जवळ जवळ ५० हजार रुपये छापण्याचा तसेच पोस्टेजचा खर्च होत असतो, जो परवडण्याच्या पलीकडे आहे. त्यासाठी सी.के.पी. सभेच्या कार्यकारीणी मंडळात असे ठरवण्यात आले आहे की उत्कर्षवृत्तासाठी वार्षिक कमीत कमी देणगी रु. १००/- तसेच जास्तीत जास्त यथाशक्ति रक्कम ''उत्कर्षवृता'' साठी सभेच्या कार्यालयात जमा करावी. तसेच आपले नांव व पोस्टल पत्ता पाठविणे तसेच देणगी अकाऊंट मध्ये देखील ट्रन्सफर करु शकता. C.K.P. Sabha, Bank of Baroda, Khanderao Market Branch. S.B. A/c. 01900100017020, IFSC Code BARBOKHANDE (Fifth Character is Zero), तसेच तुम्ही सी.के.पी. सभेचा क्युआर कोड स्कॅन करुन सुद्धा देणगी देऊ शकता.

आपण सर्वांना माहित असलेच की नुकताच सी.के.पी. सभे तर्फे सामुहिक मुंजीचा कार्यक्रम मोठ्या थाटांत संपन्न झाला तो यशस्वी करण्यासाठी मी सी.के.पी. सभेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे सर्व कार्यकर्त्यांचे तसेच मित्र परिवारांचे व अर्थात सर्व बटु तसेच त्यांच्या कुटुंबीयांचे आभार मानत आहे.

मला कळविण्यास अत्यंत आनंद होत आहे की दरवर्षी प्रमाणे ह्या वर्षी देखिल सी.के.पी. मातृवात्सल्य मंडळाने होतकरु विद्यार्थींना नोटबुक तसेच शाळेचा युनिफॉर्म चे वितरण केले. मी त्यांचे ह्या प्रशंसनीय कार्यासाठी अभिनंदन करतो.

सी.के.पी. सिनियर सिटीझन मंडळाचे मी अभिवादन करतो की त्यांनी ३०जून २०२४ रोजी त्यांचा सव्विसाव्वा वर्धापनदिन समारंभ अगदी थाटात साजरा केला तसेच ह्या समारंभात माझा सन्मान केला, त्या बद्दल मी मंडळाचा अभारी आहे.



सी.के.पी. सभेचा अन्न वाटप उपक्रम, वधुवर सुचक केन्द्र, विद्यार्थ्यांना मदत वगैरे सर्व कार्य अखंडीत चालु आहेत आणि ह्या सर्वांसाठी मी तुम्हा सर्वांना मदतीची अपील करत आहे.

पुन्हा एकदा मी कळकळीचं आवाहन करतो की आपल्या सी.के.पी. सामाजातील प्रत्येकांनी आपण समाजाचे कांही देण लागतो ह्या भावनेनी तन, मन व धनानी मदत करावी, असे आपणांस वाटत नाही कां?

आपण समाजापासून कितीही अलीप्त राहण्याचा प्रयत्न केला तरी आपल्या मुलांच्या मुंजीच्या वेळी तसेच त्याच्या लग्नाच्या वधु-वराची निवड करण्यासाठी समाजाची गरज भासते तसेच दुःखद प्रसंगात नातेवाईकां नंतर समाजच धावून येतो. म्हणतात ना! पाण्यांत राहून मास्याशी वैर करता येत नाही.

आपण चांगल्या वाईट प्रसंगात आपले शेजारी सर्व प्रथम उपयोगी पडतात, तसेच आपले मित्र-मैत्रीणी यांची आपल्याला किती गरज लागते ते मी सांगायला नको! ही सर्व समाजातीलच माणसं आहेत. नातेवाईकां नंतर सी.के.पी. समाज सर्वांना मनापासून आवडतो व समाजाला सुद्धा तुम्ही सी.के.पी. आहांत, त्याचे कौतुक वाटते व म्हणूनच आपण कौतुक समारंभ करत असतो. तरीही मित्र-मैत्रीणींनो आतां तरी तुमचा बहुमुल्य वेळ व मदत सी.के.पी. ज्ञातीला द्या व तुमच्या सूचना व चर्चा करून आपल्या समाजासाठी कांही करण्याची ईच्छा ठेवून जरूर या तुमच्यासाठी आमचे दरवाजे सदैव उघडे आहेत.

उत्कर्षवृत्ताच्या दिवाळी अंकासाठी ज्ञाती बांधवांनी आपल्या जाहिराती, कथा, कविता, लेख (एक पानी) १० ऑक्टोबर २०२४ पर्यंत अवश्य पाठवावे.

**सुजित कार्डे**

अध्यक्ष

# संस्था परिचयः
# सी.के.पी. सिनियर सिटीझन्स मंडळ, बडोदे.

बडोद्यात अनेक सी. के. पी. संस्था कार्यरत आहेत व त्या सर्व आपापल्या परीने उत्तम कार्य करीत आहेत. त्यातील एक आहे सी.के.पी. सिनियर सिटीझन्स मंडळ,बडोदे ही संस्था. २१ जुन १९९८ रोजी ह्या संस्थेची स्थापना झाली. स्थापक होते कै.श्री.रमेश देशमुख. श्री. रमेश देशमुख ही व्यक्ती त्या काळात एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून प्रसिद्ध होती. बडोद्यातील बहुतेक सर्व स्थानिक संस्थांमध्ये त्यांनी उत्तम कामगिरी बजावली होती व त्यामुळे त्यांनी जेव्हा बडोद्यात जेष्ठ व्यक्तींसाठी एक संस्था उभी करण्याचा विचार आपल्या मित्रमंडळीत बोलून दाखविला तेव्हा त्यांना उत्तम पाठींबा मिळाला आणि सर्वांनी त्यांचा विचार उचलून धरला. विचार चांगला होता पण दहा बारा मंडळी अशी संस्था कशी काय सुरु करू शकतील या बाबत शंका होती. परंतु आपल्या जिद्दीने श्री.देशमुख यांनी आपला विचार मूर्त स्वरूपात आणला. घरोघर फिरुन त्यांनी सभासद गोळा केले.सुरुवातीस सुमारे पंचवीस तीस सभासद झाले. पण त्यावर समाधान न मानता त्यांनी आपले प्रयत्न सुरूच ठेवले आणि २१ जून १९९८ रोजी ही संस्था अस्तित्वात आली. संस्थेचा मुळ उद्देश होता तो ज्येष्ठांना आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी व दूर दूर पसरलेल्या आपल्या मित्र मंडळींना महिन्यातून एकदा का होईना भेटता यावे हा होता. एकाकी जीवन जगणाऱ्या ज्येष्ठांसाठी ही एक उत्तम सोय करण्यात आली होती.

ह्या संस्थेचे वैशिष्ठ्य म्हणजे यात स्त्री सभासदांना समान अधिकार देण्यात आले. त्या काळात स्त्रिया फारशा बाहेर पडत नसत पण मंडळाने नियम केला कि सभासदत्व पती-पत्नी या दोघांना द्यायचे. त्यामुळे स्त्रिया देखील आपोआपच सभासद होत गेल्या. आज या संस्थेत स्त्रिया आणि पुरुष यांची संख्या बरोबरीने आहे. ह्या संस्थेचे कार्यालय म्हणा कि कार्यक्रम स्थळ म्हणा हे नक्की करण्यात आले ते म्हणजे सत्यभामाबाई आंबेगावकर सी.के.पी. सभागृह, दांडीयाबाजार बडोदे व दरमहा एक कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरले. मंडळाचे पहिले अध्यक्ष कै.श्री.शशिकांत फणसे हे होते. पहिली चार वर्षे त्यांनी हे पद सांभाळले. त्यानंर कै.श्री. रमेश देशमुख अध्यक्ष झाले. मंडळाने २०२३ मध्ये श्री प्रकाश स. आंबेगांवकर यांच्या अध्यक्ष पदी आपल्या स्थापनेची पंचवीस वर्षे पूर्ण केली व हे वर्ष रौप्य महोत्सवी वर्ष म्हणून थाटात साजरे केले. आजच्या तारखेस मंडळाची सभासद संख्या सुमारे चारशे आहे ज्यात काही सभासद बाहेरगावचे देखील आहेत.

वर म्हटल्या प्रमाणे संथेत सर्व सभासदांना समान अधिकार देण्यात आले होते. त्याचा परिचय पहील्या स्त्री अध्यक्षा म्हणून सौ.उज्ज्वला रणदिवे यांनी सन २०१४ ते २०१६ या दोन वर्षांसाठी अध्यक्ष पद भूषविले आणि मंडळात एक नवा पायंडा पडला. आज संस्था २६ वर्षे पूर्ण करून सत्ताविसाव्या वर्षात पदार्पण करती झाली आहे. मंडळाने आखून दिलेल्या मार्गादार्शिके प्रमाणे मंडळाचे कार्य अविरत चालू आहे. वर्षातून एक बाहेरगावची सहल, एकदिवशीय सहल तसेच दरमहा एक विविधातापूर्ण कार्यक्रम देणे ही प्रथा आजतागायत सुरु ठेवण्यात आली आहे. सभासदांचे महिन्याचे वाढदिवस आणि लग्नाचे वाढदिव साजरे करणे हे एक मंडळाचे वैशिष्ट्य आहे. तसेच प्रत्येक वर्षी मंडळाच्या वर्धापन दिवस कार्यक्रमात वयाची ७५,८०,८५,९० व त्यावरील वर्षे पूर्ण करणाऱ्या जेष्ठ सभासदांचा विशेष सत्कार कारण्यात येतो.तसेच आपल्या लग्नाची ५० वर्षे पूर्ण करणाऱ्या जोडप्यांचा आग्रहाने सत्कार करण्यात येतो.त्यांना मानपत्र व भेट वस्तू देण्यात येते.तर अशी ही संस्था बडोदेकर जेष्ठ बंधू- भगिनींसाठी आशीर्वाद समान आहे. सध्या श्री. तुषार खर्चीकर मंडळाचे सन २०२४-२५ व २०२५-२६ या कार्यकालासाठी अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

**प्रकाश सिंदकर**

मो. ९९७४५३३३८

## * हार्दिक अभिनंदन *



**मिस किमया मनीष प्रधान**

हीने 10th (CBSE), Bhavan's School मधून २०२४ यावर्षी ९५ % गुण मिळवून उत्तीर्ण झाली. तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा

**श्री प्रणव हेमंत घोसाळकर**

हे भारती विद्यापीठ पुणे येथील ऑनलाईन MBA सप्टेंबर २०२३ यावर्षी ८.३५ ग्रेड प्राप्त करून उत्तीर्ण झाले. त्यांच्या पुढील यशस्वी व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा

# कुर्यांत बटोमंगलम

सुमारे एक्क्याशी वर्षांपूर्वी बडोद्यांत कै. माणिकराव आणि कै. शंकर नारायण पालकर यांनी पुढाकार घेऊन सी. के. पी. ज्ञातीतील पहिला सामुहिक मुंजींचा भव्य सोहळा आयोजीत केला होता. अभिमानास्पद आणि आनंदाची बाब म्हणजे हिन्दु धर्मांतील सोळा संस्कारांपैकी एक अत्यंत महत्वाचा अशा या संस्काराचा सोहळा बडोद्यांतील चां. का. प्रभु सभा या संस्थेचे वेळोवेळचे उत्साही पदाधिकारी तेव्हांपासून आजपर्यंत दरवर्षी सातत्याने यशस्वीरित्या पार पाडत आलेले आहेत.

अर्थांत हे कार्य पार पाडणे नेहेमीच तितकेसे सहज सोपे नसते. या वर्षीही या कार्याच्या आयोजनाच्या मार्गांत अनेक अडचणी आल्याच. परंतु वर्तमान संस्थेच्या उत्साही आणि चिकाटीने कार्य करणाऱ्या पदाधिकाऱ्यांनी सर्व अडथळ्यांवर मात करून दिनांक २८-०५-२०२४ रोजी हा उपनयनाचा सोहळा घडवून आणलाच.

ज्ञातीतील बंधु-भगिनींनी संस्थेच्या आमंत्रणाला मान देऊन मोठ्या संख्येने उत्साहाने आणि आनंदाने या प्रसंगी हाजर राहून मौजीबंधनाची शोभा तर वृद्धिंगत केलीच पण त्याबरोबरच संस्थेला सढळ हाताने देणग्याही दिल्या.

दरवर्षीप्रमाणेच यंदाही शियाबागेतील काछीया पटेल वाडी येथे झालेल्या या सोहळ्यांत श्री गुरुजींनी उपनयन संस्कारांत करण्यांत येणारे सर्व विधी बटूंना समजावून सांगत त्यांच्याकडून व्यवस्थित करवून घेतले.

सी. के. पी. सहकारी मंडळीचे उपाध्यक्ष श्री आश्विन चित्रे यांच्याकडून वेलकम पेयाची व्यवस्था होती. तसेच त्यांनी प्रत्येक बटुला मिल्टनच्या पाण्याची बाटली आणि सी. के. पी. सहकारी मंडळीतर्फे वॉल क्लॉक भेट दिले.

विशेष उल्लेखनिय गोष्ट म्हणजे कडी, गुजरात, येथील बी. जे. पी. चे युवा अध्यक्ष श्री पारस कर्णिक यांनीही आपल्या मुलाला बटु म्हणून या सोहळ्यांत सामील केले होते. या प्रसंगी त्यांच्या कुटुंबीयांकडूनही संस्थेला सढळ हाताने देणगी देण्यांत आली. त्यांनी सी.के.पी समाजातल्या मेडिकल (वैद्यकिय) अभ्यास क्रमात शिकणाऱ्या एका गरजु विद्यार्थ्याच्या शिक्षणाचा खर्च करण्याची तयारी देखील दाखविली आहे.

सी. के. पी संभेचे अध्यक्ष श्री सुजीत कोर्डे यांनी आपल्या प्रासंगिक मनोगतांत सांगीतले की संस्थेचे मुखपत्र उत्कर्षवृत्त हे ज्ञातीबांधवांच्या देणग्यांवरच चालत असून मुखपत्राची वेगळी वर्गणी नाही. तरी सांप्रतच्या छपाई आणि कुरियर खर्चाला पुरून उरण्यासाठी ज्ञातीबांधवांनी सढळ हाताने देणगी देऊन सहकार्य करावे. तसेच त्यांनी श्री सत्यभामाबाई आंबेगांवकर ट्रस्टच्या हॉलवरही आर्थिक संकट ओढावले आहे व हॉल बंद आहे, तरी ज्ञाती बांधवांनी यासाठीही विचार विनिमय करून लौकरांत लौकर योग्य ती पाऊले उचलावित असे आवाहन केले.


या प्रसंगी बडोद्यांतील ज्ञातीतील इतर संस्थेच्या अध्यक्षांचे तसेच संस्थेच्या मागिल कार्यकारणीतल्या पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यांत आले.

ज्ञातीच्या कार्यासाठी नेहमीच उत्साहाने धांवून येणारे श्री सुजीत प्रधान यांनी आवश्यक ती फरासखान्याची उत्तम सोय केली होती.

संस्थेचे अध्यक्ष श्री सुजीत कोर्डे, उपाध्यक्ष श्री प्रशांत गुप्ते, कार्यवाह श्री सतिष ताम्हणे तसेच समस्त कार्यकारी मंडळांतील पदाधिकारी यांचे परिश्रम आणि ज्ञातीतील लोकांचा उत्तम प्रतिसाद आणि सहकार्य यामुळे एक्क्याशी वर्षांपासून (१९४३ पासून) चालत आलेला हा सामुहीक मुंजीचा सोहळा मंगलमय वातावरणांत प्रिती भोजनासह आनंदांत संपन्न झाला.

**अरूण धारकर-बडोदे**

(मो.) ९७२३६०६२६९



# चां. का. प्रभु मातृवात्सल्य मंडळ, बडोदे.

## विविध स्पर्धांचे आयोजन

बडोदे येथील सी. के. पी. मातृवात्सल्य मंडळ गेली अनेक वर्षे आपल्या ज्ञातीच्या महिला आणि बालकांना त्यांच्यातील कलागुणांना वाव देण्यासाठी अनेक कार्यक्रम वर्षभरात करत असते. याच उद्देशाने या वर्षी सुध्दा चित्रकला, वेषभूषा आणि पाककला स्पर्धा आयोजित केली होती. शनिवार दिनांक ०१.०६.२०२४ रोजी सकाळी ८ वाजता लक्ष्मी सदन, पारकर वाडा, वडोदरा येथे चित्रकला स्पर्धा आयोजित केली होती. त्यात विविध ५ गटांमध्ये ५० + स्पर्धकांनी भाग घेतला होता. परीक्षक म्हणून श्री अभय गडकरी, रांगोळी आर्टिस्ट हजर होते. प्रत्येक गटांना विविध विषय देण्यात आले होते.

दिनांक ०२.०६.२०२४ रोजी रविवारी सायंकाळी ६ वाजता वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ४ गटांमध्ये ४५ + स्पर्धकांनी भाग घेतला होता. ह्या स्पर्धेत परीक्षक म्हणून श्रीमती पल्लवी नाईक, प्रसिद्ध नाट्य कलाकार यांनी सफल रित्या कामगिरी पार पाडली. यात विशेष म्हणजे लहान स्पर्धकांमध्ये जानकीआई आणि मोठ्या स्पर्धकांमध्ये समोसा, गूगल बाबा, स्टार, यम अश्या विविध वेशभूषा केल्या होत्या.

दिनांक ०९.०६.२०२४ रविवारी वाकळ सेवा केंद्र, पारशी अग्यारी, सयाजी गंज येथे पाककला स्पर्धा आयोजित केली होती. पाककला स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्रीमती प्रियाताई व श्री राहुल गोखले होते. याच दिवशी तिन्ही स्पर्धांचे पारितोषिक वितरण समारंभ बडोद्यातील नामांकित कायदेतज्ञ श्रीमती सुलोचना बिनीवाले यांच्या अध्यक्ष स्थानी साजरा करण्यात आला. प्रथम संस्थेच्या कार्यवाह श्रीमती रचना तवकर यांनी सगळ्यांचे स्वागत करून कार्यक्रमाला सुरुवात केली. त्या नंतर संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती अलका गुप्ते यांनी संस्थेची माहिती व विविध उपक्रमांची माहिती दिली. या नंतर प्रमुख पाहुण्या श्रीमती सुलोचनाताई बिनीवाले यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले. या नंतर तिन्ही स्पर्धेच्या विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. विजेत्यांची नांवे पुढे दिली आहेत. ही पारितोषिके कु. अंजली व कु. स्वाती गुप्ते यांनी आपल्या मातोश्री कै. रीता दिनानाथ गुप्ते यांच्या स्मरणार्थ प्रायोजित केली होती.

आभार विधी करताना श्रीमती चेतना चित्रे यांनी सर्व स्पर्धक, पालक, तिन्ही स्पर्धांचे परीक्षक, सढळ हाताने मदत करणारे ज्ञात व अज्ञात ज्ञातिजन, सी.के.पी. सहकारी मंडळीचे पदाधिकारी, प्रधान डेकोरेटर्स, समारंभाच्या प्रमुख पाहुण्या श्रीमती सुलोचनाताई बिनीवाले तसेच श्री यतीन आंबेगावकर यांचे मनःपूर्वक आभार मानले.

**सौ. रचना तवकर**
कार्यवाह

## विद्यार्थ्यांना गणवेश व नोटबुक वितरण

ज्ञातितील विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविण्यासाठी चां. का. प्रभु मातृवात्सल्य मंडळा तर्फे दि. ८.६.२०२४ रोजी सायंकाळी सी. के. पी. सहकारी मंडळी येथे जवळ जवळ ७२ मुलांना गणवेश करीता मदत करण्यात आली. गणवेश करीता सौ. सुलोचना बिनीवाले यांनी रु. २१०००/-, कु. अंजली व कु. स्वाती गुप्ते यांनी रु. १००००/- आणि सौ. श्यामल ताम्हणे यांनी रु. १००००/- ची देणगी ह्या चांगल्या कार्यासाठी दिले. विशेष उल्लेख करताना आनंद वाटतो की सौ. प्राची प्रधान, कठवाडा, अहमदाबाद यांच्या कडून ह्या गरजु विद्यार्थ्यांना १ डझन चोपडे- वह्या, पेन्सिल बॉक्स व पेन वाटण्यात आले.

## सामूहिक मंगळागौर

दरवर्षी प्रमाणे ह्यावर्षी पण चां. का. प्रभु मातृवात्सल्य मंडळा तर्फे सामूहिक मंगळागौरीचे आयोजन श्रावण महिन्याच्या तिसऱ्या मंगळवारी दि. २०/०८/२०२४ रोजी करण्यात आले आहे. तरी आपल्या लेकी, सुनांची मंगळागौर थाटात साजरी करण्यासाठी मंडळाच्या कार्यकर्त्यांचा सम्पर्क साधावा.

**सौ. रचना तवकर**
कार्यवाह

# चां. का. प्रभु मातृवात्सल्य मंडळ, बडोदे.

**चित्रकला स्पर्धा विजेते**

**A - ग्रुप**

प्रथम : वैदेही पालकर
द्वितीय : नित्या प्रधान पटेल
तृतीय : चार्मी प्रधान

**B - ग्रुप**

प्रथम : अनुश्री शृंगारपुरे
द्वितीय : मनस्वी केमकर
तृतीय : आरव केमकर
प्रोत्साहन : मल्हार भागवत

**C - ग्रुप**

प्रथम : नेत्रा कोर्डे
द्वितीय : ओम कोर्डे
तृतीय : श्रीपाद साळुंके

**D - ग्रुप**

प्रथम : धन्वि ताम्हणे
द्वितीय : देवांश गडकरी
तृतीय : निया प्रधान

**E - ग्रुप**

प्रथम : शिवानी शृंगारपुरे
द्वितीय : रुची दळवी
तृतीय : अनघा ताम्हणे

**वेशभूषा स्पर्धा विजेते**

**A - ग्रुप**

प्रथम : वैदेही पालकर
द्वितीय : हर्ष ताम्हणे
तृतीय : ध्वनी परळीकर

**B - ग्रुप**

प्रथम : मनस्वी केमकर
द्वितीय : तनुष गुप्ते
तृतीय : स्वराज गडकरी
प्रोत्साहन १) आरव केमकर
२) वंश फडणीस

**C - ग्रुप**

प्रथम : रुद्रांश प्रधान
द्वितीय : ओम ताम्हणे
तृतीय : धन्वि ताम्हणे

**D - ग्रुप**

प्रथम : शितल भालेराव
द्वितीय : अनघा ताम्हणे

**पाककला स्पर्धा विजेते**

**गोड पदार्थ आंब्यापासून**

प्रथम क्रमांक : आरती दिघे
द्वितीय क्रमांक : शितल भालेराव
तृतीय क्रमांक : प्रियंका वैद्य
प्रोत्साहन : आरती परळीकर
प्रोत्साहन : शुभदा प्रधान
प्रोत्साहन : शेफाली पालकर

**तिखट पदार्थ चणे /चण्याची डाळ**

प्रथम क्रमांक : प्रियंका वैद्य
द्वितीय क्रमांक : शेफाली पालकर
तृतीय क्रमांक : अमिता खर्चिकर
प्रोत्साहन : पायल आंबेगावकर
प्रोत्साहन : राजश्री कोर्डे
प्रोत्साहन : स्वप्ना गडकरी

## चांद्रसेनीय कायस्थ प्रभु सहकारी मंडळी लिमीटेड, बडोदे.

**सस्नेह निमंत्रण**

दिनांक ०१/०८/२०२४ रोजी संस्थेच्या वाढदिवसा निमित्त (वर्धापन दिवस) ''**श्री सत्यनारायणाची पूजा**'' सकाळी ११:०० वाजता आयोजित केली आहे.

दिनांक ०१/११/२०२४ रोजी ''**लक्ष्मी पूजन**''चा समारंभ सायंकाळी ५:०० ते ६:०० वाजता आयोजित केला आहे.

दोन्ही समारंभ ''लक्ष्मी सदन'' पारकरवाडा, दांडीया बाजार, बडोदे येथे साजरे करणार आहोत, तरी आपण दोन्ही दिवशी सहकुटुंब मित्र मंडळी सह समारंभास अवश्य यावे असे आग्रहाचे निमंत्रण आहे.

**व्यवस्थापक मंडळ**

सर्व सभासदांना नम्र विनंती आहे की त्यांनी आपले K.Y.C. Details लवकरात लवकर Update करावे.





# सामुहिक मुंजी निमित्ते मिळालेल्या देणग्या

| | नाव | रुपये |
|---|---|---|
| १) | श्री पारस कर्णिक | ३०००० |
| २) | श्री निखील ठाकरे | ४००० |
| ३) | श्री चिराग प्रकाश फणसे | ३००१ |
| ४) | सौ अलका जगदीश परळीकर | ३००० |
| ५) | श्री सुजित कोर्डे | २५०१ |
| ६) | सौ सुरुता विवेक प्रधान | २५०० |
| ७) | सौ कविता सुजित प्रधान | २५०० |
| ८) | सी.के.पी सिनीअर सीटीझन्स मंडळ, बडोदे | २००१ |
| ९) | सी.के.पी मातृवात्सलय मंडळ | २००० |
| १०) | श्री जयंत केमकर | १५०१ |
| ११) | श्री प्रकाश पी प्रधान | ११११ |
| १२) | श्री प्रतिक प्रकाश प्रधान | ११११ |
| १३) | श्री प्रशांत गुप्ते | १००१ |
| १४) | श्री नयन गुप्ते | १००१ |
| १५) | श्री सतीश ताम्हणे | १००१ |
| १६) | श्री प्रकाश आंबेगावकर | १००१ |
| १७) | श्री अश्विन चित्रे | १००१ |
| १८) | श्री भवप्रदीप कर्णिक | १००१ |
| १९) | श्री प्रवीण ताम्हणे | १००१ |
| २०) | श्री अशोक वैद्य | १००१ |
| २१) | श्री राजीव प्रधान | १००१ |
| २२) | श्री संजीव जी दिघे | १००० |
| २३) | श्री यतीन आंबेगावकर | १००० |
| २४) | श्री रमेश तवकर | १००० |
| २५) | सौ वैशाली गुप्ते | १००० |
| २६) | श्री संजय आर प्रधान | १००० |
| २७) | श्री अविनाश देशपांडे | १००० |
| २८) | श्री विकास खर्चीकर | ५०१ |
| २९) | श्री राजीव केमकर | ५०१ |
| ३०) | श्री बालमुकुंद बिनीवाले | ५०१ |
| ३१) | श्री संदीप एन वेश्वीकर | ५०१ |
| ३२) | श्री मधुसूदन मोहिले | ५०१ |
| ३३) | श्री विनय आणि सौ. उज्जवला रणदिवे | ५०१ |
| ३४) | श्री नरेंद्र बिनीवाले | ५०१ |
| ३५) | श्री संजय नरेंद्र प्रधान | ५०१ |
| ३६) | श्री कमलाकर प्रधान | ५०१ |
| ३७) | श्री विजेंद्र कारखानीस | ५०१ |
| ३८) | श्री हेमंत कुमार दळवी | ५०० |
| ३९) | श्री सुनील दिघे | ५०० |
| ४०) | श्री सतीश समर्थ | ५०० |
| ४१) | श्री संदीप वैद्य | ५०० |
| ४२) | श्री प्रकाश जी प्रधान | ५०० |
| ४३) | सो प्रतिमा सुधीर खम्बालीकर | ५०० |
| ४४) | सौ वर्षा हेमंत खर्चीकर | ५०० |
| ४५) | श्री प्रकाश चौबळ | ५०० |
| ४६) | शुभचिंतक | ५०० |
| ४७) | श्री संदीप एन वेश्वीकर | २५० |
| ४८) | श्री शशांक चौबळ | २५० |
| ४९) | श्रीमती शैला शिंदे धारकर | २०१ |
| ५०) | श्री एस एस ताम्हणे | १५१ |
| ५१) | श्री मानस कुलकर्णी | १५१ |





# पाप आणि पुण्य

पुराणांत वर्णन आहे की जन्मणाऱ्या प्रत्येक जीवाबरोबर अदृश्यरित्या दोन कुंभ येतात आणि आयुष्यभर त्याची सोबत सोडत नाहीत. एका कुभांत आपल्या हातून घडणाऱ्या चांगल्या कृतींच्यामुळे पुण्याचा संचय होत रहातो तर दुसऱ्या कुंभांत आपल्या हातून घडणाऱ्या वाईट कृतींच्यामुळे पापाचा संचय होत रहातो. काया, वाचा, मने आपल्याद्वारे दुसऱ्या व्यक्तीला दुःख झाले, त्रास झाला, कष्ट झाले की पापाच्या कुभांत आपल्या हातून झालेल्या अपराधाच्या प्रमाणांत पापाची भर पडते. आपल्या द्वारे दुसऱ्या व्यक्तीला सुख, आनंद प्राप्त झाला की आपल्या जवळील पुण्याच्या कुभांत पुण्याची भर पडते.

कांहीवेळा समोरच्या व्यक्तीच्या क्षुल्लक चुकीचासुध्दा नको तेवढा आरडा ओरडा करून त्याच्या बाजूने थोडासुध्दा विचार न करता, त्याच्या मनाचा विचार न करता त्याला नको तेवढे कठोर शब्द बोलून खूप अपमान करण्याची कांही लोकांना जणू संवयच असते. कांहीवेळा हातसुध्दा उचलला जातो. जणू आपल्या हातून कांही चूका घडतच नाहीत असाच त्यांचा समज असतो. आपल्या चुकीच्या वागण्याची अगर आपल्यामुळे समोरच्या व्यक्तीच्या मनाला होणाऱ्या त्रासाची कांहीना पुष्कळदा जाणीवही नसते. कांहीना दुसऱ्यांना त्रास देण्यांतच आनंद मिळत असतो.

स्वतःच्या फायद्यासाठी, स्वार्थासाठी दुसऱ्याशी खोटे बोलणे, दुसऱ्याची फसवणूक करणे, दुसऱ्याचे नुकसान करणे, दुसऱ्याला कष्ट आणि दुःख देणे, दुसऱ्याचा उगीचच द्वेष करणे अशा आणि अशाच अनेक गोष्टींमुळे व्यक्तीच्या पापाच्या कुभांत पापाची भर पडत असते आणि त्याप्रमाणांत व्यक्तीला शारिरीक, अगर मानसिक त्रास, कष्ट सोसावे लागतात. एखाद्या अति दुष्ट व्यक्तीच्या बाबतीत आपण सहजगत्या बोलून जातो की त्याचा पापाचा घडा आता भरतच आलाय. परंतु प्रत्येकाजवळ असेच दोन पाप-पुण्याचे घडे प्रत्येकाच्या वाईट अगर चांगल्या कर्मानुसार भरले जात असतात याची मात्र पुष्कळांना जाणीवही नसते.

प्रत्येकाला आपापल्या कर्माची फळे भोगावीच लागतात हा कर्माचा सिध्दांत लक्षांत ठेवला तर प्रत्येकवेळी स्वतःकडे न्यायाधिशाची भूमिका घेऊन समोरच्याला आरोपी अगर तुच्छ समजण्याची संवय लागणार नाही. बहुसंख्य लोकांमध्ये आढळणारी सर्वांत वाईट संवय म्हणजे दुसऱ्यांची पदरचे मीठ-मिरची लावून निंदा करणे. दुसऱ्याची स्तुती करताना जड होणारी जीभ दुसऱ्याची निंदा करताना मात्र कातरीपेक्षाही जास्त गतीने चालू लागते. निंदा करणे आणि ऐकणे दोन्हीही पापांत भर टाकणाऱ्या गोष्टी आहेत. पाप-पुण्याची गोष्ट न पटणाऱ्या व्यक्तींना हे लक्षांत ठेवायला पाहिजे की सतत कोणाची निंदा करीत राहिल्याने दुसऱ्याचा द्वेष करीत राहिल्याने घरांतली सकारात्मक ऊर्जा कमी होत जाते, नकारात्मक ऊर्जा वाढीस लागते आणि त्याचा परिणाम आपल्यालाच भोगावा लागतो. घरांत कायम स्वरुपाचे आजारपण येते, पैशाचा वायफळ खर्च होत रहातो. घरांत प्रसन्नतता वाटत नाही. घरांत उगीचच चिडचिड होत रहाते. मोठे कारण नसताना क्षुल्लक कारणांवरून कुटुंबांत भांडणे होऊ लागतात आणि तरीही वेळीच सावध न झाल्यास चांगल्या हसत्या खेळत्या कुटुंबांत विभक्तपणा येतो. म्हणजे आपल्या पापाचेच फळ झाले ना? तेव्हा मोठ्या मनाने घरांतील माणसांनी एकमेकांच्या चुका पोटांत घालायाला पाहिजेत. वडील माणसांनी लहानांना त्यांचे चुकत असेल तर प्रेमाने समजावून सांगायला पाहिजे. क्षुल्लक गोष्टींना फार मोठे स्वरूप न देता त्यांच्याकडे दुर्लक्ष करायला पाहिजे आणि सर्वांनी घरांत गोड बोलण्याची संवय ठेवायला पाहिजे.

अनेकांना आपल्या अगदी निकटच्या माणसांची किंमत ती कायमची दूर जाईपर्यंत लक्षांतच येत नाही. नंतर पश्चात्ताप करण्यांत कांहीच अर्थ उरत नाही. प्रत्येक व्यक्तीत चांगले गुण असतात तसेच कांही आपल्याला न पटणारे आणि म्हणून आपल्या दृष्टीने वाईट गुण असतात. एखाद्या व्यक्तीबद्दल द्वेष वाटू लागला की त्या व्यक्तीची प्रत्येक गोष्ट चुकीचीच वाटू लागते. समजदार व्यक्तीने जुळवून घेऊन नाते टिकवून ठेवण्यांतच शहाणपणा असतो. अन्यथा नात्यांत दूरावा निर्माण होत जातो.

कोणाला सुख देणे जमले नाही तर एक वेळ चालेल पण दुःख मात्र कोणालाच देऊ नये. स्वतः आनंदांत रहावे आणि दुसऱ्यांनाही सुखाने आनंदाने जगू द्यावे. स्वतः हसत रहावे आणि आपल्या सान्निध्यांत येणाऱ्या लोकांनाही हसवत रहावे. आपण सर्वगुण संपन्न नाही. जगांत कोणीच सर्वगुण

संपन्न नसते. तरी दुसऱ्यांच्या दुर्गुणांवर, व्यंगावर, चुकांवर हसू नये आणि रागवूही नये. कोणाची केव्हा कशी मदत लागेल सांगता येत नाही. सर्वांशी प्रेमाने, आपुलकीने वागलो तर त्यापैकीच कोणीतरी आपल्या अडचणीच्या काळांत नक्कीच धांवून येते.

जगांतील अनेक गोष्टी प्रेमाने, आपुलकीने, गोड समजावून साध्य होत असतात याचीच अनेकांना आयुष्यभर जाणीव होत नाही. आपल्याच वागण्याने, बोलण्याने अनेकांशी सबंध बिघडले, अगदी जवळच्या व्यक्तीं कायमच्या दुरावल्या तरी त्यांत समोरच्या व्यक्तीचाच दोष काढत बसायचे आणि स्वताःचेच नुकशान करून घ्यायचे. व्यक्तीच्या स्वभावापायीच घनिष्ठ नाती दुरावतात आणि गाढ सबंध सुपुष्ठांत येतात. वृध्दाश्रम वाढण्याचेसुध्दा हे एक प्रमुख कारण आहे आणि म्हणूनच पाप-पुण्याची कल्पना जरी कोणाला पटली नाही किंवा वेडगळपणाची वाटली तरी त्यांनी आपले उर्वरीत आयुष्य सुखासमाधानात जावे यासाठी तरी आपल्या स्वभावावर अंकुश ठेवणे आवश्यक असते.

पाप अगर पुण्यापैकी ज्या कुंभांत संचय जास्त त्याप्रमाणे आयष्याचे शेवटचे दिवस सुखाचे अगर दुखःचे प्राप्त होतात आणि शेवटी चांगली अगर वाईट गती प्राप्त होते. व्यक्तीने आपले आयुष्य सुरळीत, आनंदांत, सुखांत आणि शांतीने जावे यासाठी (मुख्य म्हणजे शेवटचे दिवस) पाप आणि पुण्याच्या कुंभांची आठवण सतत लक्षांत ठेवून त्याप्रमाणे रोजच्या जीवनांतील व्यवहार अति दक्षतेने करीत जावेत. पाप संचय जास्त असला आणि आयुष्य संपले तर दुसऱ्या जन्मी त्या पापाची फळे भोगावी लागतात.

कांहीवेळा आपल्याला प्रश्न पडत असतात की माझ्या बाबतीतच असे का घडतय किंवा एकही गोष्ट आपल्या मनासारखी कां घडत नाही किंवा आपल्या नशिबीच इतके दुःख कां अगर नुकत्याच जन्मणाऱ्या एखाद्या बाळाला इतका त्रास कां पडावा यांची उत्तरे अर्थांतच वरील गोष्टीत सामावलेली आहेत.

**अरूण धारकर-बडोदे**

(मो.) ९७२३६०६२६९

## भावपूर्ण श्रद्धांजली

**ज्ञातीतील पुढील व्यक्तिंचे दुःखद निधन झाले आहे**

सौ. ज्योसना अशोक फणसे यांचे दि. ३०/०८/२०२३

गृप कॅप्टन श्री नितीन जुन्नरकर यांचे दि. २०/१०/२०२३

सौ. स्मिता कृष्णकुमार कोर्डे यांचे दि. २७/१२/२०२३

श्री विनोद गो. दळवी यांचे दि. २१/०२/२०२४

सौ. शमा अक्षय चित्रे यांचे दि. ०७/०३/२०२४

श्री नरेन्द्र द्वारकानाथ केमकर यांचे दि. ०१/०५/२०२४

श्री विजय रामराव कोर्डे यांचे दि. ०९/०५/२०२४

श्री दिनेशचंद्र वैद्य यांचे दि. १५/०५/२०२४

श्री दिलीप दिनकर दिघे यांचे दि. २०/०५/२०२४

श्री शरद भालचंद्र केमकर यांचे दि. २४/०५/२०२४

सौ. स्मिता कुमुदचंद्र चित्रे यांचे दि. ०३/०६/२०२४

सौ. स्मिता संजीव चिटणीस यांचे दि. १४/०६/२०२४

सौ. संध्या प्रभाकर गुप्ते यांचे दि. २०/०६/२०२४

**सर्व दिवंगत व्यक्ती तसेच ज्ञातीतिल इतर ज्ञात व अज्ञात दिवंगत बंधु-भगिनींच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना**

## डिजिटल पेमेन्ट

SCAN TO PAY ANY UPI APP

vpa : chand98240@barodampay

कळविण्यास आनंद होत आहे की, तुम्ही आपला मोबाइल स्मार्ट फोन वापरून G-Pay किंवा UPI ॲप्लिकेशन द्वारे मंडळाला देणगी, योगदान इत्यादिंची रक्कम सोबत दिलेला QR Code स्कॅन करून पाठवू शकता. पेमेन्ट पाठवल्याचा मेसेज आल्यावर त्याचा स्क्रिन शॉट श्री सतीश ताम्हणे, मो. ९८२४०७७९८२ या नंबर वर न विसरता पाठवावे.

**सुजीत कोर्डे**

(अध्यक्ष)

# आम्ही देणगीदारांचे ऋणी आहोत

| नाव | रुपये |
|---|---|
| **उत्कर्षवृत्त साठी देणगी** | |
| **श्री दिलीप विनायक** | ५००० |
| **श्री राजेश हेमचंद्र पालकर** | १००१ |
| **सौ. प्राची मनीष प्रधान** | १००० |
| **श्री दिपक चंद्रकांत माहुलकर** | १००० |
| **श्री प्रविणचंद श्रीधर दिघे** | ५५५ |
| **श्री राम कर्णिक** | २५१ |
| **श्री अरविंद एम खोपकर** | १०० |
| **श्री गडकरी** | ११११ |
| कै. सरलाबेन मनोहरराव गडकरी यांच्या स्मरणार्थ (मृत्यु ०९-०१-२०१९) | |
| **श्री देवाशिष प्रधान** | १००१ |
| कै. मार्तंड गजानंद प्रधान यांच्या स्मरणार्थ (६ एप्रिल) | |
| **श्री किरण प्रकाश हजरनिस** | १००१ |
| सौ. प्राची प्रकाश हजरनिस यांच्या पुण्यातिथी निमित्ते | |
| **सौ अर्चना आशिष दिघे** | १००० |
| कै. विनोद दळवी यांच्या स्मरणार्थ | |
| **ज्योती** | १००० |
| शकुंताला रघुनाथ पन्हाळकर यांच्या स्मरणार्थ | |
| **श्री समीर अशोक फणसे** | ५११ |
| आई स्व सौ ज्योस्ना अशोक फणसे यांच्या स्मरणार्थ | |
| **श्री संजय नरेंद्र प्रधान** | ५०१ |
| वडील कै. नरेंद्र बी. प्रधान यांच्या स्मरणार्थ (मृत्यु २९-२-२०२०) | |
| **प्रदीप नरेंद्र प्रधान** | ५०१ |
| वडील कै. नरेंद्र बी प्रधान यांच्या स्मरणार्थ (मृत्यु २९-२-२०२०) | |
| **सौ रेखा किरण श्रृंगारपुरे** | १००१ |
| पुत्र चि. समीर व चि.सौ.कां. अंकिता प्रधान ह्यांाच्या लग्ना प्रित्यर्थ (ता २५/१२/२३) | |
| **अन्नपुर्णा योजना** | |
| नीला पालकर (अन्नपूर्णा योजना) | २००० |
| संजय नरेंद्र प्रधान (अन्नपूर्णा योजना) | २००० |
| शैला विनोद दळवी (अन्नपूर्णा योजना) | १००० |






## चां. का. प्रभु विद्योत्तेजक मंडळ, बडोदे

कळविण्यास आनंद होत आहे की, वर्ष २०२४-२५ दरम्यान आपल्या ज्ञातीतील जे विद्यार्थी १२वी ची परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत किंवा जे त्या पुढील उच्चतर शिक्षण घेत आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी मंडळातर्फे शिष्यवृत्तीच्या फॉर्म्सचे वितरण संस्थेच्या कार्यालयातून सायंकाळी ६:३० ते ८:०० दरम्यान सुरू केले आहे. फॉर्म्स भरून दिनांक ७ ऑगस्ट पर्यंत कार्यालयात जमा करावे. शिष्यवृत्तिचे वाटप दिनांक ११ ऑगस्ट रोजी करण्यात येईल. याच दिवशी सर्व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शनासाठी एक शिबीर सकाळी १० वाजता संस्थेच्या कार्यलयात आयोजित केले आहे. सर्व विद्यार्थ्यांनी अवश्य उपस्थित रहावे.

✻ कार्यालय ✻
''लक्ष्मी सदन''
पारकरवाडा,
दांडीया बाजार, बडोदे

**सौ. कविता प्रधान**
कार्यवाह
मो.९८२५०२५२०१

# वधुवर सुचक केन्द्र

**योग्य सी.के.पी. जोडीदार मिळविण्यासाठी चांद्रसेनिय कायस्थ प्रभु सभा, बडोदे यांच्या**

**www.ckpworld.org**

**या संकेत स्थळावर फॉर्म व फी रु. १००० भरुन सभासद नोंधणी चालु आहे.**


| वर | रजी. नं. | जन्म तारीख | उंची | शिक्षण | नोकरी |
|---|---|---|---|---|---|
| | B/20/24 | 5/6/1995 | 6'1'' | B.E ( ELECTRICAL ENGINIER ) | PRESENTLY AT USA,H1B VISA |
| | B/21/24 | 7/11/1992 | 5'6'' | BE CSE ( INDIA ) MS A1 | ANZ BANK MELBOURNE |
| | B/22/24 | 24/12/1992 | 5'6'' | B.COM & DIPOMA IN BANKING | TAMILNAD MERANTILE BANK, MULUND BRANCH |
| | B/23/24 | 11/9/1991 | 5'9'' | M .COM | ADITYA BIRLA LIFE INSURANCE |
| | B/24/24 | 3/4/1993 | 5'9'' | B.COM & LLB | MARKETING MANGER , JAIPUR |

| वधु | रजी. नं. | जन्म तारीख | उंची | शिक्षण | नोकरी |
|---|---|---|---|---|---|
| | G/1/23 | 30/08/1998 | 5'0'' | BPT BACHELOR OF PHYSIO THERAPY | CLINIC SERVICE |
| | G/3/23 | 13/03/1990 | 5'' | M.SC ( BOTANY ) | NOT WORKING |
| | G/4/24 | 5/10/1995 | 5'' | B.A , M.A, & PURSUING PH.D | |


श्री सतीशचंद्र कोर्डे

10 अजंठा ब्राह्मण सोसायटी ठाणे

022 2540 3078 98672 48116



जोडा नाते दोन मनांचे,

जोडा नाते आयुष्याचे.

@रेशीमगाठी


**QR Code**

SCAN TO PAY ANY UPI APP

vpa : chand98240@barodampay

मंडळाला देणगी, योगदान इत्यादिंची रक्कम सोबत दिलेला QR Code स्कॅन करून पाठवू शकता. पेमेन्ट पाठवल्याचा स्क्रिन शॉट श्री सतीश ताम्हणे, मो. ९८२४०७७९८२ वर न विसरता पाठवा.

**बुक-पोस्ट**